महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**पोलीस अधीक्षक कार्यालय,**
**सातारा**
**शिरवळ पोलीस ठाणे**

पुण्यश्लोक 300

दुरध्वनी क्रमांक :- ०२१६९-२४४१३३

वेबसाईट - www.satarapolice.gov.in

ई-मेल :- shirvalps.satara@mahapolice.gov.in


**प्रेसनोट दिनांक : ११/०३/२०२६**

**पोलीस निरीक्षक शिरवळ पोलीस ठाणे यांच्याकडून अनोळखी बेवारस प्रेताबाबतचे जाहीर आवाहन**

शिरवळ पोलीस ठाणे हद्दीत मौजे पळशी ता खंडाळा जि. सातारा गावचे हद्दीत सिध्देश्वर ट्रेडर्स दुकानाचे उत्तर बाजूस निरा-देवघर कॅनॉलमध्ये दिनांक : ०८/०३/२०२६ रोजी सकाळी १०:३० वा. चे सुमारास एक अनोळखी पुरुष जातीचे बेवारस प्रेत सडलेल्या व फुगलेल्या स्थितीत मिळून आले. सदरबाबत दिनांक ०८/०३/२०२६ रोजी शिरवळ पोलीस ठाणे अकस्मात मयत रजिस्टर नंबर : १७/२०२६ बी.एन.एस.एस. कलम १९४ प्रमाणे अकस्मात मयत दाखल करण्यात येवून बेवारस मयताचा पोस्टमार्टेम पंचनामा करण्यात आला असून मिळून आलेल्या बेवारस प्रेताचे वर्णन खालीलप्रमाणे

अनोळखी बेवारस प्रेत चेहरा ओळखू न येणारे,वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे, उंची- अंदाजे ५ ते ५.३ फुट, रंग- काळसर, अंगावरील कपडयाचे वर्णन शर्ट- निळा व लाल रंगाचा मोठया चेक्सचा त्याचे कॉलरवर इंग्रजीतमध्ये SPARK असे लिहिलेले,शर्टच्या आतमध्ये घातलेले नारंगी रंगाचा गोल गळयाचा टि- शर्ट त्यावर समोरील बाजूस moving forword Brookiyn NYC, पॅन्ट- काळया रंगाची नाईट पॅन्ट,अंडरवेअर-विटकरी रंगाची त्यावर इंग्रजीत Big Boss लिहिलेले,सॉक्स- दोन्ही पायामध्ये सॉक्स त्यावर इंग्रजीमध्ये adidas असे लिहिलेले त्यामधील डाव्या पायातील सॉक्स फाटलेला,उजव्या हातावर फणा काढलेले नागाचे चिन्ह गोंदलेले आहे.

वरील बेवारस मयताचे मा. वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र,शिरवळ यांनी पोस्टमार्टेम केलेनंतर त्यांच्याकडून प्राप्त अहवालाप्रमाणे बेवारस मयताचे डाव्या डोळयाच्या भुवईच्यावर कपाळावर कोणत्यातरी धारदार शस्त्राने व डाव्या डोळयाच्या व डाव्या कानाच्यामध्ये कोणत्यातरी कठीण व बोथट हत्याराने मारहाण करुन कवटीचे हाड फ्रॅक्चर झाले आहे. सदर अहवालावरुन अनोळखी इसमास कोणीतरी अज्ञात कारणावरुन अज्ञात ठिकाणी अज्ञात हत्याराने गंभीर दुखापत करुन जिवे ठार मारुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने निरा-देवघर कॅनॉलमध्ये फेकून दिले. म्हणून वगैरे मजकूरचे तक्रारीवरुन शिरवळ पोलीस ठाणे गु.र.नं. ८३/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३(१),३(५) प्रमाणे दिनांक : ११/०३/२०२६ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास मा. तुषार दोशी सो, पोलीस अधीक्षक सातारा, श्रीमती वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक सातारा, श्री. विशाल खांबे उपविभागीय पोलीस अधिकारी फलटण भाग फलटण व श्री. यशवंत नलवडे पोलीस निरीक्षक शिरवळ पोलीस ठाणे (मो.नं. ९५८८६०९९११) यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. महादेव सिद (मो.नं. ९९७०३२९२१९) हे करीत असून तपासाकरिता मसपोनि किर्ती म्हस्के (मो.नं. ८९७५०३६१००),पोउपनि सतीश आंदेलवार (मो.नं. ९४०४५२८२२७) व पोउपनि शंकर पांगारे (मो.नं. ९२८४३८५५०९) व पोलीस अंमलदार यांची चार तपास पथके तयार करुन अनोळखी मयताची ओळख पाठविणे तसेच अज्ञात आरोपीचा शोध घेणे चालू आहे.

**जाहीर आवाहन**

आपले मार्फतीने नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येते की, आपल्या परिचयाची वरील वर्णनाची व्यक्ती ही मिसींग झाली अथवा वस्तू पाहून त्याची ओळख कोणत्याही नागरिकांना पटल्यास किंवा घातपातचा प्रकार असल्यास त्याची माहिती वरील मोबाईल नंबरवर कळवून पोलीसांना मदत करावी. आपणाकडून उपयुक्त माहिती प्राप्त झाल्यास आपले नाव गोपनिय ठेवून योग्य ते बक्षीस देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

( तुषार दोषी )
पोलीस अधीक्षक
सातारा

प्रति,

मा. संपादक/पत्रकार

सदरील बातमी व जाहीर आवाहन आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये प्रसिध्द करण्यास विनंती आहे.